१९२०-१९९५ रजि नं. २९६६/२०/६/१९२०

# ७५

## अमृत महोत्सवी वर्ष

## वार्षिक अहवाल व ताळेबंद

## १९९४-९५

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे - १.

द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : ६२२२०२, विस्तारित क्र. : ३३०

१९२०-१९९५ रजि नं. २९६६/२०/६/१९२०

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.

## ✦ संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ ✦

### पदसिद्ध अध्यक्ष

मा. श्री. भुजंगराव शंकरराव मोहिते
अप्पर पोलीस आयुक्त, पुणे
१६-८-१९९१ ते २९-६-१९९४

मा. श्री. श्रीपाद भीमराव कुलकर्णी
अप्पर पोलीस आयुक्त, पुणे
३०-६-१९९४ पासून

### ✦ पदसिद्ध चेअरमन ✦

मा. श्री. सिताराम महादू शिरसाट
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) पुणे
१५-६-१९९३ पासून

### ✦ व्हाईस चेअरमन ✦

मा. श्री. चंद्रकांत सिताराम कांबळे
२१-४-९३ ते २०-४-९४

मा. श्री. रविंद्र उत्तमराव महाले
२१-४-१९९४ पासून

### सन १९९१-९६ सालासाठी संचालक मंडळ

श्री. ज्ञानोबा मारुती झुरुंगे
श्री. शफी रहिमुदीन शेख
श्री. कृष्णा दादासाहेब उगलमोगले
श्री. अनंत वामन गुप्ते

श्री. शिवाजी हरिभाऊ साळुंके
श्री. चंद्रकांत सिताराम कांबळे
श्री. रविंद्र उत्तमराव महाले
श्री. सुभाष नरहर महाजन

**वैधानिक लेखापरीक्षक**

श्री. व्ही. एस. कुडचे ॲन्ड कं.
चार्टर्ड अकौंटंटस्
६८२, गोदावरी चेंबर्स
डेक्कन जिमखाना, पुणे - ४११ ००४.

**बँकर्स**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
जिल्हा परिषद शाखा
पुणे - ४११ ००१

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २०-६-१९९५ रोजी सकाळी ९.०० वाजता पोलीस रिक्रिएशन हॉल, शिवाजीनगर मुख्यालय, पुणे - ४११ ००५ येथे आयोजित केली आहे.

### ✦ सभेपुढील विषय ✦

१) मागील दिनांक १०-६-१९९४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) वैधानिक लेखापरीक्षक (हिशोब तपासणीस) यांच्या ३१-३-९५ अखेरच्या तपासणी अहवालाची माहिती घेणे (पान क्र. ४)
३) दिनांक ३१-३-९५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील या संस्थेच्या कामकाजाचा अहवाल, नफा-तोटा पत्रक (पान क्र. ८ ते ९), ताळेबंद (पान क्र. १० ते १३) व सन १९९५-९६ सालचे अंदाजपत्रक (पान क्र.१४ ते १५) यावर विचार करणे व तो मंजूर करणे.
४) सन १९९५-९६ सालासाठी हिशोब तपासणीस नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
५) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा-वाटणीस मंजुरी देणे (पान क्र. ५)
६) परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या उपविधीस मंजुरी देणे (पान क्र. १६ ते १७)
७) परिशिष्ट 'ब' मध्ये दर्शविलेल्या संचालक निवडणूक नियमावलीस मान्यता देणे (पान क्र. १८ ते २०)
८) संस्थेच्या अमृतमहोत्सवी निधीच्या विनियोगास मान्यता देणे (पान क्र. ३)
९) मा. अध्यक्षसाहेब यांच्या परवानगीने आयत्या वेळेस सभेपुढे येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

सि. म. शिरसाट
चेअरमन
दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप.
क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे-१

पुणे : दि. २०-५-१९९५

### —: सभासदांसाठी सूचना :—

१) सभेस येतांना कृपया अहवाल बरोबर आणावा.
२) सभासदांना काही माहिती अहवालसंदर्भात विचारायची असल्यास त्यासंबंधी १२-६-१९९५ पर्यंत कार्यालयाकडे लेखी कळवावी.
३) ज्या सभासदांनी अद्याप मागील तीन वर्षातील लाभांश रक्कम नेली नसेल त्यांनी ती सत्वर नेण्याची व्यवस्था करावी. अन्यथा ती रक्कम गंगाजळीमध्ये जमा करण्यात येईल. थकबाकीदारांचा लाभांश त्यांचे खाती जमा करण्यात येईल.
४) वार्षिक सर्वसाधारण सभेत होणाऱ्या कामकाजाबाबत नोटीशीमध्ये निर्देशिलेल्या बाबी संबंधीची कागदपत्रे सोसायटीच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
५) सभेस आवश्यक गणसंख्या (पंचवीस) न झाल्यास ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी ९.३० वाजता उपस्थित सभासदांमध्ये त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता नाही.
६) ज्या सभासदास आपले वारस निश्चित करायचे असतील त्यांनी संस्थेकडे त्वरित संपर्क साधावा.
७) ज्या सभासदांना सेवानिवृत्तीस दोन वर्षे बाकी असेल त्यांनी दुसऱ्या कर्जदारास जामीन राहू नये, अन्यथा सेवानिवृत्तीनंतर जमा शेअर्सची रक्कम परत मिळणेस अडचण निर्माण होईल याची नोंद घ्यावी.
८) सभासदांनी आपल्या बदललेल्या घराच्या पत्त्यांची नोंद संस्थेकडे करावी म्हणजे पत्रव्यवहार करणे सुलभ होईल.
९) सभेचे काम शिस्तीत पार पाडले पाहिजे याबाबत सर्व सभासदांनी दक्षता घ्यावी.
१०) ज्या सभासदांना सभेत बोलायचे आहे त्यांनी जास्तीत जास्त दहा मिनिटेच बोलावे.तसेच त्या सभासदाने एकाच वेळी आपले म्हणणे मांडावे. तोच तोच मुद्दा पुन्हा पुन्हा मांडू नये.

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

## द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.

## ७५ वा वार्षिक अहवाल

**मा. अध्यक्षमहोदय व सभासद बंधू-भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या सन १९९४-९५ च्या आर्थिक सहकारी वर्षाचा (१-४-९४ ते ३१-३-९५ चा) अहवाल व ३१-३-१९९५ रोजी संपलेल्या आर्थिक हिशोबाची पत्रके संचालक मंडळाचे वतीने सादर करताना मला आनंद होत आहे.

आपल्या संस्थेस आज ७५ वर्षे पूर्ण होऊन संस्था अमृत महोत्सव साजरा करीत आहे. या आनंदसोहळ्यानिमित्त मी आपणा सर्व उपस्थित सन्मान्य पाहुण्यांचे व सभासदांचे स्वागत करीत आहे. आजच्या या मंगल दिनाचे मानकरी आपण सर्व सभासद आहात ही खरोखर भाग्याची गोष्ट आहे.

संस्थेची माहिती व अहवाल आपल्या समोर मी आता सादर करीत आहे.

### सभासद संख्या

अहवालसाल आरंभी ७१११ सभासद पटावर होते. अहवाल सालात ४८८ नवीन सभासद झाले असून २८२ सभासदांचे सभासदत्व सेवानिवृत्ती, राजीनामे, मृत्यू, बदली व इतर वैयक्तिक कारणांनी कमी होऊन अहवालसाल अखेरी ७३१७ इतकी सभासद संख्या झाली.

### सभा

अहवाल सालात वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १०-६-१९९४ रोजी झाली. सभेत पदाधिकाऱ्यांसह ९१ सभासद हजर होते. या सभेत सन १९९३-९४ सालच्या कामकाजाच्या अहवाल स्वीकृती, सदर सालचे हिशोब व नफा वाटणीस मंजुरी, पोटनियम दुरुस्ती आदी कामे झाली.

अहवाल सालात संचालक मंडळाच्या १५ सभा झाल्या.

### भागभांडवल

अहवालसाल आरंभी भांडवल ४,९९,८६,९५०/- रुपये होते. चालू वर्षी मासिक शेअर वर्गणी व रोख शेअर खरेदीमुळे भागभांडवलात भर पडून अहवालसाल अखेर भागभांडवल ५,६५,३९,१२०/- रुपये एवढे झाले.

### राखीव निधी व इतर निधी

मागील सालच्या नफा वाटणीतून व प्रवेश फीच्या रूपाने अहवाल सालात रु. १७,१८,५४८-१० ची राखीव निधीत भर पडून सालअखेर राखीव निधीची रक्कम रु. ७४,४७,९८१-०८ इतकी झाली आहे.

इतर निधींची रक्कम सालअखेरीस रु. ४८,१२,१५९-६१ इतकी झाली आहे.

### ठेवी

अहवालसाल आरंभी संस्थेत सभासदांच्या रु. २८,९४,३१०-६५ च्या ठेवी जमा होत्या. सालअखेर रु. ४१,०६,३५१-६५ च्या ठेवी जमा आहेत.

तसेच सेवकांच्या साल आरंभी रु. १,६७,३७७-४० ठेवी जमा होत्या. सालअखेर ठेवी रु. २,३०,७१५-५५ च्या जमा आहेत.

### बँक कर्ज

संस्थेला बँकेचे कॅश क्रेडिट कर्ज नाही. संस्था स्वभांडवलावर उभी आहे. ही बाब सर्व सभासदांना अभिमानास्पद आहे.

### गुंतवणूक

संस्थेची सालअखेरीस पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शेअर्स, रिझर्व्ह फंड, सेवक ग्रॅच्युईटी निधी, इमारत निधी व इतर निधीमध्ये ३,०९,४०,१०३-०० ची गुंतवणूक आहे.

### सभासद कर्ज / सेवक कर्ज

अहवाल सालात संस्थेने २०६३ सभासदांना रु. ३,४८,१८,५००/- चे कर्जवाटप केले असून अहवाल सालात कर्ज वसुली रु. ३,३०,३०,२४५/- एवढी झाली आहे.

दि. ३१-३-९५ अखेर सभासदांकडून रु. ४,५८,९६,४९५/- कर्ज येणे आहे.

अहवाल सालात ११ सेवकांना रु. १,८४,५००/- चे कर्जवाटप करण्यात आले व अहवाल सालात रु. १,६५,०५०/- कर्ज वसुली झाली असून सालअखेर सेवकांकडून रक्कम रु. १,१८,०००/- चे कर्ज येणे आहे.

### बँकेला द्यावयाचे कमिशन

मा. पोलीस आयुक्त पुणे यांचे कार्यालयाकडून येणाऱ्या मासिक वसुलीची रक्कम रुपये २५ लाख दरमहा असते. ही रक्कम स्टेट बँकेकडून मिळणाऱ्या ड्राफ्टद्वारे मिळते.



या रकमेवर बँक सुरुवातीला नाममात्र कमिशन आकारत असे, तथापि डिसेंबर १९९४ पासून त्यांनी हे कमिशन वाढविले असून दरमहा सुमारे १२००/- रु. कमिशन बँकेला द्यावे लागते.

### अमृत महोत्सव निधी

गतवर्षी दि. १०-६-९४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महोत्सव निधी रु. १३,८८,८८९-९६ स्वतंत्र निधीमध्ये गुंतवण्याविषयी ठराव मंजूर झाला होता, तथापि या गुंतवणुकीमुळे सभासदांना त्याचा प्रत्यक्ष त्वरित आर्थिक फायदा होत नाही ही भावना सभासदांमध्ये झाल्यामुळे संचालक मंडळाने ह्या निधीचा विनियोग सभासदांना आर्थिक लाभाद्वारे करावा असे योजिले आहे. त्यानुसार सभासदांना त्यांच्या ३१-३-१९९४ च्या जमा शेअर्सवर तीन टक्के रक्कम 'अमृत महोत्सवी' भेट म्हणून देण्यात येईल, त्यास मान्यता द्यावी.

### हिशोब तपासणी

संस्थेची ३१-३-१९९४ अखेरची हिशोब तपासणी (वैधानिक लेखापरीक्षण) मे. जी. एम. काकडे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौंटंट यांनी केले असून त्यांनी संस्थेस 'अ' वर्ग दिला आहे.

संस्थेची ३१-३-९५ अखेरची वैधानिक तपासणी श्री. व्ही. एम. कुडचे ॲण्ड कं.,चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांनी पूर्ण केली असून त्यांनीही संस्थेस 'अ' वर्ग दिला आहे. संस्थेस सातत्याने ४६ वर्षे 'अ' वर्ग मिळत आहे.

### थकबाकी

अहवालसाल अखेर एकूण २५४ सभासदांकडून रु. ३,९३,०००/- एवढी कर्जाची थकबाकी येणे आहे. सभासदांच्या गैरहजेरीमुळे पगार तहकुबी, दुसऱ्या जिल्ह्यात बदल्या, सेवानिवृत्ती (स्वेच्छा, सक्तीने सेवानिवृत्ती), बडतर्फी इत्यादी कारणांमुळे कर्जबाकी येणे दिसत आहे. विशेषतः गैरहजेरीमुळे पगार बंद असल्यामुळे १५४ सभासदांकडून थकबाकी येणे आहे. याबाबतीत सभासदांकडून कर्जफेड नियमित होण्यासाठी सहकार्याची अपेक्षा आहे.

तसेच बाहेर जिल्ह्यात बदली होणाऱ्या सभासदांकडून संपूर्ण कर्जबाकी भरून घेतली जाईल याचीही नोंद घ्यावी.

संस्था थकबाकी वसुलीसाठी अत्यंत प्रयत्नशील असून सर्व संबंधित अधिकाऱ्यांशी योग्य त्या पातळीवर पत्रव्यवहार करण्यात येतो. काही थकबाकीदारांकडून १-४-९५ नंतरही थकबाकी वसूल झाली असून अहवाल सालात थकबाकीचे प्रमाण येणे कर्जाशी ०.८५ टक्के इतके आहे.

### सभासद कल्याण निधी

सदर निधी योजना १-४-१९९१ पासून कार्यान्वित असून त्यासाठी प्रत्येक सभासदांकडून दरवर्षी मार्चचे वेतनातून रु. १२/- घेण्यात येतात. या निधीतून एखादा सभासद मयत झाला तर त्याचे कर्ज, त्याचे जमा शेअर्स व सभासद कल्याण निधीतून मिळणारी मदत (रु. २,०००) कर्ज रकमेतून वजा करून उरलेली कर्जबाकी माफ केली जाते. यामुळे मयत सभासदाचे वारसास दिलासा मिळाला असून अहवाल सालातील हिशोब अहवालात स्वतंत्ररित्या दिला आहे.

### संस्थेचे कामकाज

अहवाल सालात सर्व खर्च वजा जाता निव्वळ नफा रु. ७६,७४,०४२-८५ झाला आहे. संस्थेच्या संचालक मंडळाने सालाबादप्रमाणे १२ टक्के लाभांशाची शिफारस केली असून सदर नफावाटणीस सर्व सभासदांनी मान्यता द्यावी.(कृपया नफावाटणी पत्रक पहावे.)

लाभांशाचे वाटप वार्षिक सभेनंतर त्वरित करण्यात येईल.

### समारोप

अहवाल सालात सभासदांकडून, पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, जिल्हा परिषद शाखा पुणे, येथील कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

तसेच संस्थेचे मा. पदसिद्ध अध्यक्ष व मा. जिल्हा उपनिबंधक, सहकार खाते यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांचा आभारी आहे.

श्री. जी. एम. काकडे ॲन्ड कं., वैधानिक लेखापरीक्षक यांनी ३१-३-९४ अखेर केलेंल्या हिशोब तपासणी व श्री. व्ही. एस. कुडचे आणि कं., वैधानिक लेखापरीक्षक यांनी केलेल्या ३१-३-९५ अखेरच्या हिशोब तपासणीबद्दल त्यांचे आभार मानतो.

संस्थेच्या चेअरमनपदाची जबाबदारी पार पाडतांना सर्व सभासद, संचालक, व्हाईस चेअरमन व संस्थेचे सेवक वर्ग यांनी केलेंल्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देऊन हा १९९४-९५ चा अहवाल पूर्ण करीत आहे.

**सि. म. शिरसाट**

चेअरमन

दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह

क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे-१

व

सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पुणे.

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

**द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.**

## वैधानिक लेखापरीक्षण अहवाल

**(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा)**

मी, दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., पुणे या संस्थेचा सोबत जोडलेल्या ३१ मार्च १९९५ अखेर या दिनांकाच्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफातोटा पत्रकाचे लेखापरीक्षण केले असून अहवाल करतो की--

१) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पतीस येईल, त्यावरून संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्याखालील नियम व संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) मी तपासलेला ताळेवंद व नफातोटा पत्रके संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहेत.

४) माझ्या मते संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच मला देण्यात आलेल्या खुलाशावरून हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात आणि

१) ताळेवंदाच्या बावतीत दिनांक ३१ मार्च १९९५ ची संस्थेच्या परिस्थितीची

२) नफातोटा पत्रकाचे बाबतीत,या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या अगर मुदतीत संस्थेच्या नफ्याची व तोट्याची लेखापरिक्षण अहवाल भाग १ व भाग २ मध्ये अवलोकनास पात्र राहून सत्य स्थिती दर्शवित आहे.

५) सहकारी वर्ष १९९४-९५ करिता संस्थेस ''अ'' वर्ग देण्यात आलेला आहे.

स्थळ : पुणे
दिनांक : २०-५-९५

व्ही. एस. कुडचे आणि कं.
चार्टर्ड अकौंटंट्स्


# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

**द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.**


## तसलमात खर्च खात्याचा तपशील

| अ.क्र. | तपशील | रु. पैसे |
|---|---|---|
| १) | प्रवास खर्च (बँक भरणा वगैरे) | १,६०५-०० |
| २) | संचालक मंडळ मासिक मिटिंग खर्च | १,८०८-६० |
| ३) | पाहुणे / ऑडिटर्स चहा व किरकोळ खर्च | ३,१९०-५० |
| ४) | कार्यालय किरकोळ दुरुस्ती वगैरे | ३,०८२-१० |
| ५) | वार्षिक सभा खर्च | ७,३७४-२५ |
| | एकूण रुपये | १७,०६०-४५ |




# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

**द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.**


## सन १९९४-९५ सालच्या नफ्याची नियोजित वाटणी

संस्थेस दि. ३१-३-१९९५ अखेर निव्वळ नफा रुपये ७६,७४,०४२-८५ झाला असून त्यात मागील वर्षीचा शिल्लक नफा रु. ७१,३२०-८० मिळून एकूण नफा रु. ७७,४५,३६३-६५ झाला आहे. संचालक मंडळाने सुचविलेली नफा वाटणी खालीलप्रमाणे आहे, त्यास मंजुरी द्यावी.

| अ. क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १) | गंगाजळी निधी २५ टक्के (दि. ३१-३-९५ चे नफ्यावर) | १९,१८,५१०-०० |
| २) | लाभांश (दि. ३१-३-९४ चे भांडवलावर १२ टक्के) | ५७,४३,४७१-२० |
| ३) | इमारत निधी | ७०,०००-०० |
| ४) | धर्मादाय निधी | १३,०००-०० |
| ५) | शिल्लक नफा (पुढील वर्षासाठी) | ३८२-४५ |
| | एकूण रुपये | ७७,४५,३६३-६५ |

## कारणपरत्वे थकबाकीचा तपशील (३१-३-९५ अखेर)

| अ. क्र. | थकबाकीचे कारण | थकबाकीदार | थकबाकीची रक्कम मुद्दल | व्याज |
|---|---|---|---|---|
| १) | पगार तहकुबी | १५४ | १,८२,५००/- | १,२२,१७८/- |
| २) | बाहेर जिल्हात बदली | ८३ | १,६५,४५०/- | ७५,७५७/- |
| ३) | सेवानिवृत्ती | ६ | २९,१५० | १३,३२३/- |
| ४) | बडतर्फी | १० | १४,५००/- | १२,७६७/- |
| ५) | मयत (वारसा प्रकरण) | १ | १,४००/- | १,४००/- |
| | एकूण | २५४ | ३,९३,००० | २,२५,४२५/- |

## सभासद कल्याण निधी

| | | रु. |
|---|---|---|
| १) | मागील वर्षीची शिल्लक | ५,५६,८७८-६० |
| २) | सन १९९४-९५ मधील जमा | + ३,८६,६४०-०० |
| | एकूण | ९,४३,५१८-६० |
| ३) | सन १९९४-९५ मधील मयत सभासदांची माफी | – १,१६,१०८-४० |
| ४) | ३१-३-९५अखेर शिल्लक | ८,२७,४१०-२० |

| पु. ल. जक्का | र. उ. महाले | सि. म. शिरसाट |
|---|---|---|
| सेक्रेटरी | व्हा. चेअरमन | चेअरमन |

## दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

### द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे – ४११ ००१

### जमा नावे पत्रक : दि. १-४-९४ ते दि. ३१-३-९५

| जमा तपशील | रुपये पैसे | नावे तपशील | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| सभासद शेअर | ८६,७६,८६०.०० | सभासद शेअर | २१,२४,६९०.०० |
| गंगाजळी निधी | १७,१८,५४८.१० | सभासद प्रवेश फी | २,४४०.०० |
| सभासद प्रवेश फी | २,४४०.०० | नाममात्र सभासद प्रवेश फी | ३५.०० |
| नाममात्र सभासद प्रवेश फी | ३५.०० | सेवक भविष्य निधी | ६०,५००.०० |
| सोसायटी महोत्सव निधी | २,००,०००.०० | सभासद कल्याण निधी | १,१६,१०८.४० |
| सोसायटी इमारत निधी | ४५,०००.०० | सेवक कल्याण निधी | १८,०००.०० |
| संशयित बुडीत कर्ज निधी | ५०,०००.०० | बँक ओव्हर ड्राफ्ट (७९) | ३,५७,८७,८७३.५० |
| सेवक ग्रॅच्युईटी निधी | ४५,५००.०० | बँक कॅश क्रेडीट (२३) | ३,४१,६६,४४३.०० |
| सेवक भविष्य निधी | १,२९,३७०.६० | सेवक मुदत ठेव | ६८,९१६.१० |
| सभासद कल्याण निधी | ३,८६,६४०.०० | सभासद मुदत ठेव | ७,३७,४७७.५५ |
| सेवक कल्याण निधी | १,००,१४४.०० | थकबाकी व्याज तरतूद | १,११,८४०.०० |
| लाभांश समीकरण निधी | ५०,०००.०० | सभासद ठेव व्याज देणे | १,५५,३१५.७५ |
| बँक ओव्हर ड्राफ्ट (७९) | ३,५६,१८,४१५.५० | सभासद लाभांश देणे | १७,२०५.८० |
| बँक कॅश क्रेडीट (२३) | ३,४३,१९,६२०.०० | सभासद लाभांश देणे | ९,९३६.०० |
| सेवक मुदत ठेव | १,३२,२५४.२५ | सभासद लाभांश देणे | १७,०६७.२० |
| सभासद मुदत ठेव | १९,४९,५१८.५५ | सभासद लाभांश देणे | ५०,७०,६३२.५० |
| थकबाकी व्याज तरतूद | २,२५,४२५.०० | मेहेनताना देणे | ४७,८१९.८५ |
| सभासद ठेव व्याज देणे | १,६३,५५१.८५ | सभासद शेअर अनामत देणे | ३३,११०.९० |
| सभासद लाभांश देणे | ५०,८९,७१४.०० | जादा कर्ज वसुली देणे | ६,६५०.०० |
| मेहेनताना देणे | ५१,०००.०० | अनामत देणे | ३,५२,५१,७३०.०० |
| सभासद शेअर अनामत देणे | ३६,८३७.९० | ऑडीट फी देणे | ४७,६७६.०० |
| जादा कर्ज वसुली देणे | १५,६५०.०० | सभासद शेअर वर्गणी | ८७,४५,११०.०० |
| अनामत देणे | ३,५२,५५,५१९.०० | सहकार शिक्षण निधी | १,०००.०० |
| ऑडीट फी देणे | ५०,०००.०० | सेवक सानुग्रह अनुदान/बोनस | ५५,३९८.०० |
| सभासद शेअर वर्गणी | ८७,४५,५१०.०० | सेवक व्यवसाय कर | ५,८२२.०० |
| सहकार शिक्षण निधी | १,०००.०० | धर्मदाय निधी देणे | ४,५००.०० |
| सेवक सानुग्रह अनुदान / बोनस | ६१.२५८.०० | नफा-तोटा खाते | ६८,२९,७२०.६० |
| सेवक व्यवसाय कर | ५,८२२.०० | बँक सेव्हींग्ज | ३,१९,२७७.०० |
| धर्मदाय निधी देणे | १०,०००.०० | बँक सेव्हींग्ज | १,५३,२९९.०० |
| संचालक निवडणूक खर्च तरतूद | ५०,०००.०० | बँक सेव्हींग्ज | ७१,५३९.०० |
| | | बँक मुदत ठेव (गंगाजळी) | ३९,७४,३००.०० |
| एकूण रुपये | १३,३१,८५,६३३.७५ | एकूण रुपये | १३,४०,११,४३३.१५ |



### जमा नावे पत्रक :
### दि. १-४-९४ ते दि. ३१-३-९५

| जमा तपशील | रुपये पैसे | नावे तपशील | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| एकूण रुपये | १३,३१,८५,६३३.७५ | एकूण रुपये | १३,४०,११,४३३.१५ |
| नफा तोटा खाते | ७०,६४९.४० | बँक मुदत ठेव | ७७,१५,०००.०० |
| बँक सेव्हींग्ज खाते | ५,५०,०००.०० | बँक मुदत ठेव (भविष्यनिधी) | १,६७,३८६.०० |
| बँक सेव्हींग्ज खाते | १,५०,५००.०० | बँक मुदत ठेव | ३५,५०,०००.०० |
| बँक सेव्हींग्ज खाते | २०,०००.०० | बँक मुदत ठेव (ग्रॅच्यूईटी) | ५१,९७७.०० |
| बँक मुदत ठेव (गंगाजळी) | २२,४८,७००.०० | बँक मुदत ठेव | ९,१०३.०० |
| बँक मुदत ठेव (भविष्य निधी) | ७६,०००.०० | सभासद कर्ज खाते | ३,४८,१८,५००.०० |
| बँक मुदत ठेव | ३५,५०,०००.०० | सेवक कर्ज खाते | १,८४,५००.०० |
| बँक मुदत ठेव (ग्रॅच्युईटी) | ३०,०००.०० | सेवक ठेव तारण कर्ज | ६३,५००.०० |
| सभासद कर्ज खाते | ३,३०,३०,२४५.०० | सभासद ठेव तारण कर्ज | २,०२,५००.०० |
| सेवक कर्ज खाते | १,६५,०५०.०० | सभासद कर्ज व्याज येणे | २९,३०,४६९.०० |
| सभासद ठेव तारण कर्ज | १,८६,८५२.७५ | सेवक कर्ज व्याज येणे | ३,५७०.०० |
| सेवक ठेव तारण कर्ज | ३७,१००.०० | सभासद तारण कर्ज व्याज येणे | ८,६९६.७० |
| सभासद कर्ज व्याज येणे | २७,०८,२५६.०० | | |
| सेवक कर्ज व्याज येणे | ४,०७१.०० | सेवक तारण कर्ज व्याज येणे | २,५३५.०० |
| ॲडव्हान्स येणे | ५६,९७४.२५ | ॲडव्हान्स येणे | ५७,३७४.२५ |
| अनामत येणे | १,४००.०० | सेवक पगार उचल येणे | ७,२००.०० |
| सेवक पगार उचल येणे | ७,२००.०० | | |
| फर्निचर व डेडस्टॉक | ३,५९५.०५ | | |
| फॉर्म पुस्तके शिल्लक | १२,६३२.०० | खर्च बाबी नफातोटा पत्रकाप्रमाणे | २२,५६,१८५.७० |
| सभासद तारण कर्ज व्याज येणे | १०,१५१.३५ | | |
| सेवक तारण कर्ज व्याज येणे | ४,८८२.२५ | अखेरची शिल्लक | २९१.५५ |
| उत्पन्न बाबी नफा-तोटा पत्रकाप्रमाणे | ९९,३०,२२८.५५ | | |
| आरंभीची शिल्लक | १००.०० | | |
| एकूण रुपये | १८,६०,४०,२२१.३५ | एकूण रुपये | १८,६०,४०,२२१.३५ |

| पु. ल. जक्का<br>सेक्रेटरी | र. ऊ. महाले<br>व्हाईस चेअरमन | सि. म. शिरसाट<br>चेअरमन |
|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण रुपये | १८,६०,४०,२२१.३५ | एकूण रुपये | १८,६०,४०,२२१.३५ |

पु. ल. जक्का
सेक्रेटरी

र. ऊ. महाले
व्हाईस चेअरमन

सि. म. शिरसाट
चेअरमन

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१

## नफा तोटा पत्रक दि १-४-९४ ते दि. ३१-३-९५

| सन १९९३-९४ रुपये पैसे | खर्च तपशील | | सन १९९४-९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ४,४५,८२०.५० | **दिलेले व्याज** | | ५,०३,७९९.२५ |
| ८३,२५७.०० | १) बँक ओव्हर ड्राफ्ट | ६४,०१०.०० | |
| ३,१५,०४३.२० | २) सभासद मुदत ठेव | ४,११,२०६.४० | |
| १६,८१५.६० | ३) सेवक मुदत ठेव | २४,३५४.२५ | |
| ३०,७०४.७० | ४) सेवक भविष्य निधी | ४,२२८.६० | |
| ५,१९,४३७.०० | **सेवक पगार व तरतुदी** | | ५,७७,३४३.०० |
| ४,००,५५८.०० | १) सेवक पगार व भत्ते | ४,३९,९९५.०० | |
| ५५,३९८.०० | २) सेवक सानुग्रह अनुदान/बोनस | ६१,२५८.०० | |
| ४३,४८१.०० | ३) सेवक भविष्य निधी वर्गणी | ३०,५९०.०० | |
| २०,०००.०० | ४) सेवक ग्रॅच्युईटी निधी | ४५,५००.०० | |
| ९,२८,०५८.३५ | **इतर खर्च व तरतुदी** | | ८,९९,६१८.४५ |
| ५५,०००.०० | १) ऑडीट फी तरतूद | ५०,०००.०० | |
| ५०,०००.०० | २) मेहेनताना तरतूद | ५१,०००.०० | |
| १,०००.०० | ३) सहकार शिक्षण निधी | १,०००.०० | |
| ४,०००.३५ | ४) फर्निचर व डेडस्टॉक घसारा | ३,५९५.०५ | |
| ३००.०० | ५) सोसायटी व्यवसायकर | ३००.०० | |
| २०,०००.०० | ६) संचालक निवडणूक खर्चात तरतूद | ५०,०००.०० | |
| १६,७५०.०० | ७) संचालक सभा भत्ता | ९,७००.०० | |
| १,००,०००.०० | ८) सभासद कल्याण निधी तरतूद | ३,००,०००.०० | |
| ५०,०००.०० | ९) सेवक कल्याण निधी तरतूद | १,००,०००.०० | |
| ४५,१६६.४५ | १०) फॉर्म छपाई व स्टेशनरी | ५३,४०७.९५ | |
| ८,७९३.०० | ११) टपाल खर्च | ९,५५२.०० | |
| १३,९३७.५५ | १२) तसलमात खर्च | १७,०६०.४५ | |
| १,००,०००.०० | १३) लाभांश समिकरण निधी तरतूद | ५०,०००.०० | |
| १,८३६.०० | १४) कॅश विमा खर्च | १,९२८.०० | |
| ४,६१,०००.०० | १५) महोत्सव निधी तरतूद | २,००,०००.०० | |
| २७५.०० | १६) बँक कमिशन | १,९७५.०० | |
| ००.०० | १७) कायदेशीर सल्ला फी खर्च | १००.०० | |
| १,११,८४०.०० | **थकबाकी व्याज तरतूद** | | २,२५,४२५.०० |
| १,००,०००.०० | **संशयित व बुडीत कर्ज निधी** | | ५०,०००.०० |
| २१,०५,१५५.८५ | एकूण खर्च | | २२,५६,१८५.७० |
| ६८,३०,१८३.३५ | निव्वळ नफा | | ७६,७४,०४२.८५ |
| ८९,३५,३३९.२० | एकूण रुपये | | ९९,३०,२२८.५५ |

पुणे
दिनांक : २०-५-९५

तपासले, आमच्या याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.
व्ही. एस. कुडचे
चार्टर्ड अकौंटंटस्



| सन १९९३-९४ रुपये पैसे | उत्पन्न तपशील | | सन १९९४-९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ८८,५४,३५१.२० | **मिळालेले व्याज** | | ९९,२०,८५९.५५ |
| ६४,०३,००९.८० | १) सभासद कर्जावरील | ६९,३३,७९२.१० | |
| १५,४६७.५० | २) सेवक कर्जावरील | १९,०८८.०० | |
| २४,०४,२९८.२५ | ३) बँक मुदत ठेवीवरील | २९,३८,३८०.०० | |
| १३,३२०.०० | ४) बँक सेव्हिंग्ज खात्यावरील | ११,८०३.०० | |
| १५,१२४.६५ | ५) सभासद तारण कर्जावरील | १४,६८९.३५ | |
| ३,१३१.०० | ६) सेवक तारण कर्जावरील | ३,१०७.१० | |
| ७४,७७५.०० | **बँक शेअर लाभांश** | | २,७००.०० |
| ५,८३८.०० | **फॉर्म विक्री** | | ५,८०९.०० |
| ३७५.०० | **दाखला फी** | | ८६०.०० |
| ८९,३५,३३९.२० | एकूण रुपये | | ९९,३०,२२८.५५ |

| पु. ल. जक्का | र. ऊ. महाले | सि. म. शिरसाट |
|---|---|---|
| सेक्रेटरी | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१

## ताळेबंद पत्रक दि. ३१-३-१९९५ अखेरचे

**भांडवल व देणे**

| सन १९९३-९४ रुपये पैसे | तपशील | | सन १९९४-९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **भाग भांडवल** | | |
| ७,००,००,०००.०० | १) अधिकृत भाग भांडवल | | ७,००,००,०००.०० |
| ४,९९,८६,९५०.०० | २) वसूल भाग भांडवल | | ५,६५,३९,१२०.०० |
| ९७,२९,५४६.३९ | **गंगाजळी व इतर निधी** | | १,२२,६०,१४०.६९ |
| ५७,२९,४३२.९८ | १) गंगाजळी निधी | ७४,४७,९८१.०८ | |
| ४,०१,०००.०० | २) इमारत निधी | ४,४६,०००.०० | |
| ५,२०,०००.०० | ३) संशयित बुडीत कर्ज निधी | ५,७०,०००.०० | |
| ५,५५,०००.०० | ४) लाभांश समिकरण निधी | ६,०५,०००.०० | |
| १३,८८,८८९.९६ | ५) सोसायटी महोत्सव निधी | १५,८८,८८९.९६ | |
| १,३०,०००.०० | ६) सेवक ग्रॅच्युईटी निधी | १,७५,५००.०० | |
| ३,२३,७७७.८५ | ७) सेवक भविष्य निधी | ३,९२,६४८.४५ | |
| ५,५६,८७८.६० | ८) सभासद कल्याण निधी | ८,२७,४१०.२० | |
| १,२४,५६७.०० | ९) सेवक कल्याण निधी | २,०६,७११.०० | |
| ३०,६१,६८८.०५ | **मुदत ठेवी** | | ४३,३७,०६७.२० |
| २८,९४,३१०.६५ | १) सभासद मुदत ठेवी | ४१,०६,३५१.६५ | |
| १,६७,३७७.४० | २) सेवक मुदत ठेवी | २,३०,७१५.५५ | |
| ५,७४,४८१.८५ | **इतर देणी व तरतुदी** | | ७,५४,९५५.६० |
| १,११,८४०.०० | १) थकबाकी व्याज तरतूद | २,२५,४२५.०० | |
| ४८,९७१.१५ | २) सभासद ठेव व्याज | ५७,२०७.२५ | |
| ००-०० | ३) सेवक ठेव व्याज | ००.०० | |
| १७,२०५.८० | ४) सभासद लाभांश (९१-९२) | २३,५२८.३० | |
| ३३,४६४.३० | ५) सभासद लाभांश (९२-९३) | १६,३५८.७० | |
| ३३,४२५.९० | ६) सभासद लाभांश (९३-९४) | १९,०८१.५० | |
| ५३,९४९.०० | ७) मेहेनताना देणे | ५७,१२९.१५ | |
| ५५,७५०.६० | ८) सभासद शेअर अनामत | ५९,४७७.६० | |
| १९,६१०.४० | ९) जादा कर्ज वसुली | २८,६१०.४० | |
| ८,८१९.०० | १०) अनामत देणे | १२,६०८.०० | |
| ५४,८४९.०० | ११) ऑडीट फी तरतूद | ५७,१७३.०० | |
| ४,५१०.०० | १२) सभासद शेअर वर्गणी | ४,९१०.०० | |
| १,०००.०० | १३) सहकार शिक्षण निधी | १,०००.०० | |
| ५५,३९८.०० | १४) सेवक सानुग्रह अनुदान / बोनस | ६१,२५८.०० | |
| २,८९९.०० | १५) धर्मदाय निधी | ८,३९९.०० | |
| ७२,७८९.७० | १६) संचालक निवडणूक तरतूद | १,२२,७८९.७० | |
| ६,३३,५२,६६६.२९ | रुपये पुढील पानावर | | ७,३८,९१,२८३.४९ |



**जिंदगी व येणे**

| सन १९९३-९४ रुपये पैसे | तपशील | | सन १९९४-९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १६,८०,१२१.१९ | **रोख व बँक शिल्लक** | | १५,२०,२०८.७४ |
| १००.०० | १) रोख शिल्लक | २९१.५५ | |
| ३,९६,३९२.५७ | २) बँक सेव्हिंग्ज (२६१६) | १,६५,६६९.५७ | |
| ४१,७३७.६६ | ३) बँक सेव्हिंग्ज (४५५९) | ४४,५३६.६६ | |
| १,०१२.१० | ४) बँक सेव्हिंग्ज (४५६०) | ५२,५५१.१० | |
| ९,९९,३५२.३५ | ५) बँक ओव्हर ड्राफ्ट (७९) | ११,६८,८१०.३५ | |
| २,४१,५२६.५१ | ६) बँक कॅश क्रेडिट (२३) | ८८,३४९.५१ | |
| २,१३,७७,०३७.०० | **गुंतवणूक** | | ३,०९,४०,१०३.०० |
| ३०,०००.०० | १) बँक शेअर्स | ३०,०००.०० | |
| ५७,११,४००.०० | २) बँक मुदत ठेव (गंगाजळी) | ७४,३७,०००.०० | |
| २,६५,१८४.०० | ३) बँक मुदत ठेव (भविष्य निधी) | ३,५६,५७०.०० | |
| २६,६९,०००.०० | ४) बँक मुदत ठेव (इतर निधी) | १,०३,८४,०००.०० | |
| १,२५,००,०००.०० | ५) बँक मुदत ठेव | १,२५,००,०००.०० | |
| १,१८,१००.०० | ६) बँक मुदत ठेव (ग्रॅच्युईटी) | १,४०,०७७.०० | |
| ८३,३५३.०० | ७) बँक मुदत ठेव (इमारत) | ९२,४५६.०० | |
| ४,४३,४५,६४२.७५ | **कर्जे** | | ४,६१,९५,३९५.०० |
| ४,४१,०८,२४०.०० | १) सभासद कर्जे (पैकी थकलेले रु. ३,९३,०००/-) | ४,५८,९६,४९५.०० | |
| ९८,५५०.०० | २) सेवक कर्जे | १,१८,०००.०० | |
| १,१९,३५२.७५ | ३) सभासद ठेव तारण कर्जे | १,३५,०००.०० | |
| १९,५००.०० | ४) सेवक ठेव तारण कर्जे | ४५,९००.०० | |
| २७,२४,००८.४० | **व्याज येणे** | | २९,४१,९१८.५० |
| २७,०८,२५६.०० | १) सभासद कर्ज व्याज (पैकी थकलेले रु. २,२५,४२५/-) | २९,३०,४६९ | |
| ४,०७१.०० | २) सेवक कर्ज व्याज | ३,५७०.०० | |
| ७,५१३.६० | ३) सभासद ठेव तारण कर्ज व्याज | ६,०५८.९५ | |
| ४,१६७.८० | ४) सेवक ठेव तारण कर्ज व्याज | १,८२०.५५ | |
| ४९,२९७.६५ | **मालमत्ता** | | ३३,०७०.६० |
| ३६,०१७.२५ | १) फर्निचर व डेडस्टॉक | ३२,४२२.२० | |
| ६४८.४० | २) लायब्ररी | ६४८.४० | |
| १२,६३२.०० | ३) फॉर्म पुस्तके शिल्लक | ००.०० | |
| ७,०१,७६,१०६.९९ | रुपये पुढील पानावर | | ८,१६,३०,६९५.८४ |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१

## भांडवल व देणे — ताळेबंद पत्रक दि. ३१-३-१९९५ अखेरचे

| सन १९९३-९४ रुपये पैसे | तपशील | | सन १९९४-९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ६,३३,५२,६६६.२९ | रुपये मागील पानावरून | | ७,३८,९१,२८३.४९ |
| ६८,३०,३९२.०० | नफा | | ७७,४५,३६३.६५ |
| २०८.६५ | १) मागील शिल्लक नफा | ७१,३२०.८० | |
| ६८,३०,१८३.३५ | २) चालू निव्वळ नफा | ७६,७४,०४२.८५ | |
| ७,०१,८३,०५८.२९ | एकूण रुपये | | ८,१६,३६,६४७.१४ |

पुणे
दिनांक : २०-५-९५

तपासले, आमच्या याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.
व्ही. एस. कुडचे
चार्टर्ड अकौंटंटस्



## जिंदगी व येणे

| सन १९९३-९४ रुपये पैसे | तपशील | | सन १९९४-९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ७,०१,७६,१०६.९९ | रुपये मागील पानावरून | | ८,१६,३०,६९५.८४ |
| ६,९५१.३० | इतर येणे | | ५,९५१.३० |
| २,८९१.३० | १) अनामत येणे | १,४९१.३० | |
| ३,६००.०० | २) सेवक पगार उचल | ३,६००.०० | |
| ४६०.०० | ३) ॲडव्हान्स येणे | ८६०.०० | |
| ७,०१,८३,०५८.२९ | एकूण रुपये | | ८,१६,३६,६४७.१४ |

| सेक्रेटरी | व्हाईस चेअरमन | चेअरमन |
|---|---|---|
| पु. ल. जक्का | र. ऊ. महाले | सि. म. शिरसाट |

### संचालक मंडळ

श्री. ज्ञा. मा. झुरुंगे
श्री. अ. वा. गुप्ते
श्री. श. र. शेख
श्री. शि. ह. साळुंके
श्री. चं. सि. कांबळे
श्री. कृ. दा. उगलमोगले
श्री. सु. न. महाजन

| | | | |
|---|---|---|---|
| | | १००.०० | १,०००.[illegible] |
| एकूण खर्च | २१,१२,६००.०० | २२,५६,१८५.७० | २७,४६,३००.०० |
| निव्वळ नफा | ७९,३७,८००.०० | ७६,७४,०४२.८५ | ९२,१२,४००.०० |
| एकूण रुपये | १,००,५०,४००.०० | ९९,३०,२२८.५५ | १,१९,५८,७०० |



| | | | |
|---|---|---|---|
| एकूण रुपये | १,००,५०,४००.०० | ९९,३०,२२८.५५ | १,१९,५८,७००.०० |

पु. ल. जक्का<br>सेक्रेटरी

र. ज़. महाले<br>व्हाईस चेअरमन

सि. म. शिरसाट<br>चेअरमन

## दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१

### सन १९९५-९६ चे अंदाज पत्रक

| खर्च तपशील | सन १९९४-९५ अंदाज | सन १९९४-९५ प्रत्यक्ष खर्च | सन १९९५-९६ अंदाज |
|---|---|---|---|
| बँक ओव्हर ड्राफ्ट व्याज | १,५०,००० | ६४,०१०.०० | १,५०,०००.०० |
| सभासद ठेव व्याज | ३,५०,०००.०० | ४,११,२०६.४० | ५,००,०००.०० |
| सेवक ठेव व्याज | १८,०००.०० | २४,३५४.२५ | २५,०००.०० |
| सेवक भविष्य निधी व्याज | ३५,०००.०० | ४,२२८.६० | १०,०००.०० |
| सेवक पगार व भत्ते | ४,५०,०००.०० | ४,३९,९९५.०० | ५,००,०००.०० |
| सेवक सानुग्रह अनुदान/बोनस | ६५,०००.०० | ६१,२५८.०० | ७५,०००.०० |
| सेवक भविष्य निधी वर्गणी | ४७,०००.०० | ३०,५९०.०० | ४०,०००.०० |
| सेवक ग्रॅच्युईटी निधी | २०,०००.०० | ४५,५००.०० | २०,०००.०० |
| ऑडीट फी तरतूद | ६०,०००.०० | ५०,०००.०० | ६०,०००.०० |
| मेहेनताना तरतूद | ६०,०००.०० | ५१,०००.०० | ६०,०००.०० |
| सहकार शिक्षण निधी | १,०००.०० | १,०००.०० | १,०००.०० |
| सोसायटी व्यवसाय कर | ३००.०० | ३००.०० | ३००.०० |
| फर्निचर डेडस्टॉक घसारा | ५,०००.०० | ३,५९५.०५ | ५,०००.०० |
| जाहिरात खर्च | १,०००.०० | ००.०० | ५,०००.०० |
| संचालक निवडणूक तरतूद | २०,०००.०० | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| संचालक सभा भत्ता | १८,०००.०० | ९,७००.०० | १२,०००.०० |
| फॉर्म छपाई व स्टेशनरी | ५५,०००.०० | ५३,४०७.९५ | ६०,०००.०० |
| टपाल खर्च | १५,०००.०० | ९,५५२.०० | १५,०००.०० |
| तसलमात खर्च | १७,०००.०० | १७,०६०.४५ | २०,०००.०० |
| देणगी खर्च | २,०००.०० | ००.०० | २,०००.०० |
| बँक कमिशन खर्च | ३००.०० | १,९७५.०० | १८,०००.०० |
| कॅश वीमा खर्च | २,०००.०० | १,९२८.०० | २,०००.०० |
| सानुग्रह अनुदान | १५,०००.०० | ००.०० | १५,०००.०० |
| सभासद कल्याण निधी तरतूद | १,००,०००.०० | ३,००,०००.०० | ३,५०,०००.०० |
| सेवक कल्याण निधी तरतूद | ८०,०००.०० | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद | १,००,०००.०० | ५०,०००.०० | १,००,०००.०० |
| थकबाकी व्याज तरतूद | १,२५,०००.०० | २,२५,४२५.०० | ३,००,०००.०० |
| लाभांश समिकरण निधी तरतूद | १,००,०००.०० | ५०,०००.०० | १,००,०००.०० |
| महोत्सव निधी तरतूद | २,००,०००.०० | २,००.०००.०० | १,५०,०००.०० |
| कायदेशीर सल्ला फी खर्च | १,०००.०० | १००.०० | १,०००.०० |
| एकूण खर्च | २१,१२,६००.०० | २२,५६,१८५.७० | २७,४६,३००.०० |
| निव्वळ नफा | ७९,३७,८००.०० | ७६,७४,०४२.८५ | ९२,१२,४००.०० |
| एकूण रुपये | १,००,५०,४००.०० | ९९,३०,२२८.५५ | १,१९,५८,७०० |

| उत्पन्न तपशील | सन १९९४-९५ अंदाज | सन १९९४-९५ प्रत्यक्ष उत्पन्न | सन १९९५-९६ अंदाज |
|---|---|---|---|
| सभासद कर्जावरील व्याज | ७०,००,०००.०० | ६९,३३,७९२.१० | ८४,००,०००.०० |
| सेवक कर्जावरील व्याज | १५,०००.०० | १९,०८८.०० | २०,०००.०० |
| बँक ठेवीवरील व्याज | ३०,००,०००.०० | २९,३८,३८०.०० | ३५,००,०००.०० |
| बँक सेव्हिंग्जवरील व्याज | १०,०००.०० | ११,८०३.०० | १२,०००.०० |
| सभासद ठेव तारण कर्ज व्याज | १५,०००.०० | १४,६८९.३५ | १५,०००.०० |
| सेवक ठेव तारण कर्ज व्याज | २,०००.०० | ३,१०७.१० | ३,५००.०० |
| बँक शेअर्स लाभांश | ३,०००.०० | २,७००.०० | २,७००.०० |
| फॉर्म विक्री | ५,०००.०० | ५,८०९.०० | ५,०००.०० |
| दाखला फी | ४००.०० | ८६०.०० | ५००.०० |
| एकूण रुपये | १,००,५०,४००.०० | ९९,३०,२२८.५५ | १,१९,५८,७००.०० |

| पु. ल. जक्का<br>सेक्रेटरी | र. ऊ. महाले<br>व्हाईस चेअरमन | सि. म. शिरसाट<br>चेअरमन |
|---|---|---|

| अ. क्र. | सध्याचा नियम क्र. | नवीन नियम क्र. | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | सुधारित उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | इ-१-३ | – | अधिनियम व त्या खालील नियमांच्या तरतुदीनुसार मागील सहकारी वर्षाच्या शेवटच्या दिवशीच्या जमा रकमेवर पूर्ण पैसे भरलेल्या भागावर लाभांश दिला पाहिजे. | नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला (१ एप्रिल) रोजी असलेल्या संस्थेच्या सभासदास अधिनियम व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार मागील वर्षाच्या अखेरच्या दिवशी (३१ मार्च) असलेल्या शेअर्सवर लाभांश दिला जाईल. | लाभांशपात्र असण्यासाठी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला सभासदत्व असले पाहिजे याचा खुलासा व्हावा म्हणून. |
| २ | फ-१-२ (अ) | – | **कर्ज मंजुरी**<br>संचालक मंडळ ज्या सभासदांची पोलीस खात्यात तीन (३) वर्षे नोकरी पूर्ण झाली असेल त्याला रु. १८,०००/- (अठरा हजार फक्त) इतक्या कमाल रकमेइतके कर्ज मंजूर करू शकेल. अशा कर्ज मंजूर झालेल्या प्रत्येक सभासदाने कर्ज मंजूर रकमेच्या एक दशांश इतक्या किमान रकमेचे शेअर्स धारण करणे आवश्यक आहे. | **कर्ज मंजुरी**<br>संचालक मंडळ, ज्या सभासदांची पोलीस खात्यात तीन (३) वर्षे नोकरी पूर्ण झाली असेल त्याला खालील कमाल रकमेइतके कर्ज मंजूर करू शकेल. अशा कर्ज मंजूर झालेल्या प्रत्येक सभासदाने कर्ज मंजूर रकमेच्या एक दशांश इतक्या किमान रकमेचे शेअर्स धारण करणे आवश्यक आहे.<br><br>**धारण केलेले शेअर्स (द.म.चे पगारातून)** – **कर्जमर्यादा रुपये**<br>३०००/- पर्यंत – १५,०००/-<br>३१०० ते ५०००/- – १८,०००/-<br>५१०० ते ८०००/- – २०,०००/-<br>८१०० ते पुढे – २२,०००/- | वाढत्या गरजा भागविण्यासाठी वाढीव कर्जाची सभासदांनी मागणी केल्यामुळे सदर उपविधीची योजना. |



| अ. क्र. | सध्याचा नियम क्र. | नवीन नियम क्र. | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | सुधारित उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ग (१) ८ | – | **व्यवस्थापक समिती**<br>वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडलेल्या अकरा सदस्यांची व्यवस्थापक समिती राहील. अशा रितीने निवडून आलेल्या व्यवस्थापक समितीची मुदत पाच वर्षे म्हणजे निवडून आलेल्या तारखेपासून पुढील पाच वर्षांने निवडून येणाऱ्या व्यवस्थापक समितीच्या पहिल्या सभेपर्यंत राहील. एकूण ११ जागांपैकी कलम ७३ ब प्रमाणे २ जागा राखीव राहतील. | **व्यवस्थापक समिती**<br>व्यवस्थापक समितीची घटना पुढीलप्रमाणे राहील.<br>१) अप्पर पोलीस आयुक्त, पुणे शहर हे संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष व साहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) हे संस्थेचे पदसिद्ध चेअरमन राहतील.<br>संचालक मंडळाच्या १३ (तेरा) जागांसाठी निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यामार्फत घेण्याची व्यवस्था संचालक मंडळ करील.<br>अशा रितीने निवडून आलेल्या व्यवस्थापक समितीची मुदत पाच वर्षे म्हणजे निवडून आलेल्या तारखेपासून पुढील पाच वर्षांने निवडून येणाऱ्या व्यवस्थापक समितीच्या पहिल्या सभेपर्यंत राहील. एकूण १३ जागांपैकी कलम ७३ ब व ७३ बबब प्रमाणे खालीलप्रमाणे ४ जागा राखीव व इतर ९ जागा सर्वसाधारण गटासाठी असतील.<br>१) मागासवर्गीय सभासद (अनुसूचित जाती, जमाती व विमुक्त जातीसाठी) – १ जागा<br>२) आर्थिकदृष्ट्या कमकुवत सभासद (दुर्बल घटक) (सभासदाचे वार्षिक उत्पन्न ४२०० पेक्षा अधिक नाही असे) – १ जागा<br>३) महिलांसाठी – २ जागा<br>एकूण – १३ जागा | सहकारी सुधारित कायद्यातील कलम ७३ बबब च्या तरतुदीनुसार संचालक मंडळावर महिला प्रतिनिधी घेणे आवश्यक असल्यामुळे २ महिला प्रतिनिधी संचालक मंडळावर घेण्यासाठी सदर उपविधी. |

| अ. क्र. | सध्याचा नियम क्र. | नवीन नियम क्र. | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | सुधारित उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | नवीन | १ (३) | – | महिलांसाठी जागा - व्याख्या<br>कलम ७३ बबब अन्वये संचालक मंडळाच्या एकूण संख्येनुसार महिलांसाठी जागा राखीव राहतील. | सहकारी सुधारित कायद्यातील कलम ७३ बबब च्या तरतुदीनुसार |
| २ | नवीन | १ (५) | – | **रिक्त होणारी पदे**<br>सेवानिवृत्ती / मयत या कारणास्तव रिक्त होणाऱ्या संचालकांचे पदावर त्या त्या गटात निवडून आलेल्या उमेदवाराच्या लगेचच्या खालच्या क्रमांकाने मते मिळविलेल्या उमेदवाराची निवड केली जाईल.<br>बाहेर जिल्ह्यात बदली झालेला संचालक पुनः संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यात तीन महिन्यात बदलून आल्यास त्याचे संचालकपद चालू राहील. जर सदर संचालक तीन महिन्यात बदलून न आल्यास त्याचे संचालकपद रद्द होऊन ते पद वरील पद्धतीने भरण्यात येईल. | सेवानिवृत्ती / मयत / बदली इत्यादी कारणामुळे संचालकपद प्रचलित उपविधी क्र. ग-१-१० (४) नुसार रद्द होत असे व ते पद पुढील निवडणुकीपर्यंत रिक्त रहात असे. सभासदांनी असे पद रिक्त राहू नये असे मत प्रतिपादन केल्यामुळे. |



| अ. क्र. | सध्याचा नियम क्र. | नवीन नियम क्र. | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | सुधारित उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ७ | २ | **संचालक मंडळ**<br>संचालक मंडळाच्या अकरा सभासदांची निवडणूक दर ५ वर्षाने निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यामार्फत घेण्याची व्यवस्था संचालक मंडळ करील. एकूण ११ संचालक राहतील. पैकी<br>१) सर्वसाधारण सभासद – ९<br>२) मागासवर्गीय सभासद – १<br>३) दुर्बल घटक सभासद – १<br>राखीव जागा म्हणजे अनु. जाती, जमाती व आर्थिकदृष्ट्या कमकुवत (दुर्बल घटक) असे उमेदवार. दुर्बल घटक म्हणजे ज्यांचे उत्पन्न रु. ४२००/- पेक्षा अधिक नाही असे.<br>दुर्बल घटकाचा उमेदवार निवडून न आल्यास, असे प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार आहे अशा व्यक्तीस निवडणुकी नंतर झालेल्या पहिल्या संचालक मंडळाच्या सभेच्या तारखेनंतर १५ दिवसांचे आत ठरावाने मान्यता घेऊन संचालक मंडळ स्वीकृत करेल. | **संचालक मंडळ**<br>मा. अप्पर पोलीस आयुक्त, पुणे हे पदसिद्ध अध्यक्ष व मा. सहा. पो. आ. (प्रशासन) पुणे शहर हे पदसिद्ध चेअरमन राहतील.<br>या व्यतिरिक्त पोटनियम ग(१)(८) अन्वये संचालक मंडळाच्या एकूण १३ जागांसाठी निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यामार्फत घेण्याची व्यवस्था संचालक मंडळ करील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.<br>१) सर्वसाधारण गट - ९ जागा<br>२) राखीव सभासद गट - २ जागा<br>१) मागासवर्गीय-१ (अनु. जाती/जमाती / विमुक्त जाती)<br>२) दुर्बल घटक -१<br>(ज्याचे उत्पन्न वार्षिक रु. ४२०० पेक्षा अधिक नाही असे)<br>३) महिला – २<br>राखीव जागा व महिलांसाठी उमेदवार निवडून न आल्यास ज्यांना असे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार आहे अशा सभासदास निवडणुकीनंतर होणाऱ्या पहिल्या संचालक मंडळाचे सभेत ठराव करून स्वीकृत करता येईल. तसे न झाल्यास वरील जागा उर्वरित काळासाठी रिक्त राहतील. जर संचालकांच्या विशिष्ट गटापैकी कोणत्याही गटात (सर्वसाधारण, राखीव व महिला गट) विहित संख्येपेक्षा कमी उमेदवार उभेअसतील तर वैध उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. | सहकारी सुधारित कायद्यातील कलम ७३ बबब च्या तरतुदीनुसार संचालक मंडळावर महिला प्रतिनिधी घेणे आवश्यक असल्यामुळे २ महिला प्रतिनिधी संचालक मंडळावर घेण्यासाठी योग्य ती तरतूद करण्याकरिता. |

| अ. क्र. | सध्याचा नियम क्र. | नवीन नियम क्र. | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | सुधारित उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ११ | ७ | निवडणुकीसाठी मतदान केंद्रे खालीलप्रमाणे राहतील.<br>१) शिवाजीनगर पोलीस मुख्यालय<br>२) चव्हाणनगर पोलीस मुख्यालय<br>३) फरासखाना व<br>४) खडकी पोलीस स्टेशन<br>५) पोलीस आयुक्त कार्यालय | मतदान केंद्रे<br>पुणे शहरातील<br>१) शिवाजीनगर पोलीस मुख्यालय<br>२) पोलीस आयुक्त कार्यालय, व आवश्यकतेनुसार पोलीस स्टेशन्स | पुणे ग्रामीण पोलीसांना पोस्टाने मतदान करण्याची सवलत वार्षिक सभेत सभासदांनी बंद करण्याची मागणी करण्यात आली, तसेच ग्रामीण पोलीसांना मतदान करता यावे यासाठी पुणे शहर व पुणे ग्रामीण भागात मतदान केंद्रे असण्यासाठी. |
| | १२ | ७ | पुणे ग्रामीण पोलीस विभागातील (पुणे शहर, चव्हाणनगर विभाग सोडून) मतदाराचे सोईसाठी पोस्टाने मतदान करण्याची, त्यांचे (सभासदांचे) विनंतीनुसार सवलत देण्यात येईल. | तसेच पुणे ग्रामीण पोलीस यांचेकडील<br>१) चव्हाणनगर पोलीस मुख्यालय व आवश्यकतेनुसार पुणे जिल्ह्यातील पोलीस स्टेशन्स ही मतदान केंद्रे असतील. | |



# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

## द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.

### सन १९८७-८८ ते १९९४-९५ चा तुलनात्मक तक्ता

| तपशील | १९८७-८८ | १९८८-८९ | १९८९-९० | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | ५,७७५ | ६,३१२ | ६,६३० | ६,७३८ | ६,७६० | ६,८८७ | ७,१११ | ७,३१७ |
| भागभांडवल | १,१२,७९,९९० | १,६६,१५,११० | २,४१,४५,९९० | २,९५,१२,५२० | ३,६५,६६,४५० | ४,३०,४३,५१० | ४,९९,८६,९५० | ५,६५,३९,१२० |
| निधी | ८,६८,४५६ | १४,२९,६६९ | २४,५१,५०४ | ३६,७१,१८७ | ४९,९२,४५३ | ७२,६१,७२१ | ९७,२९,५४६ | १,२२,६०,१४० |
| बँक कॅश क्रेडिट | ८८,९९,३४८ | १,८९,६७,०६१ | १,६२,५६,२७२ | ६५,७०,२२१ | – | – | – | – |
| ओव्हर ड्राफ्ट | ५१,३७३ | ३६,५९३ | ८६,८५२ | ९३,४७६ | – | – | – | – |
| सभासद ठेवी | ५,०९,४३५ | ८,८७,५१२ | १३,४२,३४० | १८,२७,६८६ | २२,८४,७५१ | २२,३२,८०३ | २८,९४,३१० | ४१,०६,३५१ |
| सेवक ठेवी | ३१,८०६ | ७५,२८९ | ७३,२६५ | १,२९,६८१ | ९७,४४८ | १,०१,९०३ | १,६७,३७७ | २,३०,७१५ |
| गुंतवणूक | २२,४५,००० | ३६,६७,२६२ | ४३,७८,०८० | ४४,३१,९३४ | ९४,४९,५६७ | १,७१,४९,२०० | २,१३,७७,०३७ | ३,०९,४०,१०३ |
| सभासद कर्जे | २,०४,९५,४७५ | ३,५८,५३,६९० | ४,२५,०५,२६५ | ४,०२,३१,९२५ | ३,७६,५१,५७५ | ३,८७,३३,००५ | ४,४१,०८,२४० | ४,५८,९६,४९५ |
| थकबाकी | ९९,८७५ | १,९२,५५० | २,७३,७०० | ४,३६,३५० | ४,३४,७५० | ३,७३,०५० | ४,२९,२५० | ३,९३,००० |
| निव्वळ नफा | १३,६५,३०४ | २१,०६,४४० | २९,२९,९७५ | २९,२७,२४४ | ४९,८३,२३० | ५६,९५,२५३ | ६८,३०,१८३ | ७६,७४,०४२ |
| लाभांशाची टक्के | १२ टक्के | १३ टक्के | १३ टक्के | ९ टक्के | १३ टक्के | १२ टक्के | १२ टक्के | १२ टक्के |
| लाभांशाची रक्कम | ८,५०,४०० | १४,२०,९८५ | २१,१६,२९८ | २१,२२,६०२ | ३७,२२,५६६ | ४२,०८,२२७ | ५०,६७,१७५ | ५७,४३,४७१ |
| ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |

## दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

**द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.**

### मुदत ठेव व्याजाचे दर

१) ६ महिन्यापेक्षा कमी द.सा.द.शे. ५ टक्के
२) ६ महिने ते ११ महिने द.सा.द.शे. ९॥ टक्के
३) १२ महिने ते २३ महिने द.सा.द.शे. १०॥ टक्के
४) २४ महिने ते ३५ महिने द.सा.द.शे. ११ टक्के
५) ३६महिने ते ४७ महिने द.सा.द.शे. ११॥ टक्के
६) ४८ महिने ते ५९ महिने द.सा.द.शे. १२ टक्के
७) ६० महिने ते पुढील कालावधी द.सा.द.शे. १३ टक्के

**दामदुप्पट कालावधी ६६ महिने**

**ठेवीवरील मासिक व्याज योजना चालू आहे.**

### सभासदांना सूचना

१) खात्यामध्ये १ वर्ष सेवा झाल्यावर सभासद होता येईल.
२) सभासदांना खात्यात ३ वर्षे सेवा झाल्याशिवाय कर्ज मिळणार नाही.
३) नवीन सभासदांना ६ महिन्यानंतर, मात्र ३ वर्षाची सेवा असल्यासच कर्ज मिळेल.
४) कर्ज अर्ज पाठविताना अर्जावर नमूद केलेल्या सूचनेनुसार अर्ज व्यवस्थित भरून पाठवावा. अर्जासोबत कर्जबाकी भरावी.
५) आपले अर्ज त्या त्या महिन्यात लवकरात लवकर १८ तारखेपर्यंत पाठवावेत. अन्यथा उशिरा येणाऱ्या अर्जदारांना प्रतिक्षा यादीनुसार थांबावे लागेल.
६) संचालक मंडळाची मिटिंग काही अडचण न आल्यास साधारणतः दर महिन्याच्या २० तारखेस होते व कर्ज मंजुरीचे चेक्स ३ तारखेनंतर अदा करण्यात येतात. सदरचे चेक्स लवकरात लवकर घेऊन जावेत, अन्यथा त्या महिन्याच्या कर्जाचा हप्ता लागला जाईल. चेक नेताना ओळखपत्र आणावे.
७) कर्ज अर्जाची किंमत ॲडेसिव्ह स्टँपसह रु. २२ असून कर्जअर्जावरील बचनचिठ्ठीवर ३ रेव्हेन्यू स्टँप्स लावून कर्जदार व जामीनदार यांच्या सह्यांची पूर्तता करावी.
८) कर्जाचे कारण ''घरगुती कारण'' असे अस्पष्ट नको. शेतीसाठी कर्ज मिळणार नाही.
९) कर्ज अर्ज खराब करू नये. अस्वच्छ अर्ज बदलून द्यावा लागेल.

### ● कार्यालयीन वेळ ●

सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (सरकारी सुट्ट्या सोडून)
पैसे भरण्याची वेळ : दुपारी ११.०० ते ३.००
भोजनाची वेळ : दुपारी १.३० ते २.००



## दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,

**द्वारा : पोलीस आयुक्त कार्यालय पुणे - ४११ ००१.**

### माहे ३१-३-१९९५ अखेर जमा शेअर्स व कर्जबाकी पत्रक

| सभासद क्रमांक | ३१-३-९४ अखेर जमा शेअर्स रक्कम | १-४-९४ ते ३१-३-९५ अखेर जमा वर्गणी | ३१-३-९५ अखेर कर्जबाकी |
|---|---|---|---|
| | | | |

वरील हिशोबासंबंधी तसेच अहवालासंबंधी काही शंका असल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी सात दिवस किंवा सभेनंतर सात दिवसपर्यंत संस्थेच्या कार्यालयात अहवालाची मूळ प्रत पाहून खात्री करावी.

**सि. म. शिरसाट**
चेअरमन

सभासद क्रमांक

बुक-पोस्ट

प्रति

श्री/श्रीमती ______________________

______________________

______________________

जि. पुणे, PIN | | | | | |

If not delivered, Pl. return to :

चेअरमन

दि. पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,

द्वारा पोलीस आयुक्त कार्यालय,

पुणे - ४११ ००१.

मुद्रक : दि प्रिमिअर को-ऑप. प्रिंटर्स लि., चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४११ ००४.